MHCO300000902026

दाखल दिनांक : १९.०१.२०२६

नोंदणी दिनांक : १९.०१.२०२६

निकाल दिनांक : १८.०७.२०२६

| कालावधी : | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०० | ०५ | २९ |

## न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालय.

(पिठासीन अधिकारी – श्री. व्हि. व्हि. जोशी)

सहकार दावा क्र.१०६/२०२६. निशाणी क्र.१९.

शिवसाई नागरी सहकारी पतसंथा मर्यादित }
बुलढाणा रजि.नं.३४४, मेहकर, जानेफल चौक, }
गायकवाड कॉम्प्लेक्स, मेहकर, ता.मेहकर, }
जि.बुलढाणा तर्फे व्यवस्थापक: श्री.निवृत्ती } वादी...
शंकरराव शेळके, वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी, }
रा.फ्लॅट नं.२०५, रणजीत अपार्टमेंट, लहाने }
ले–आऊट, ता.जि.बुलढाणा. }

:: विरुध्द ::

१} मुरलिधर बळीराम डोंगरदिवे }
वय : ५७ वर्षे, धंदा : नोकरी }
रा.राम नगर, मेहकर, ता.मेहकर, जि.बुलढाणा. }

२} रामदास रंगनाथ भुतेकर }
वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी, }
रा.सवणा, पोस्ट सुलतानपुर, }
ता.चिखली, जि.बुलढाणा. }

३} प्रभाकर दशरथ विरशिद }

18/07/26

वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी, }
रा.गजानन नगर, वॉर्ड क्र.१७, }
ता.चिखली, जि.बुलढाणा. } प्रतिवादी...

दावा :- रक्कम रु.१२,८३,७१८/- वसुलीकरीता..

---

वादीतर्फे विद्वान वकील – श्री. अतुलकुमार एस. बनारसे,
प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे – दावा एकतर्फी चालविण्यात आला.

---

## – निकालपत्र –
(आज दिनांक १८ जुलै, २०२६ रोजी पारीत)

१. वादी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत रजिष्टर असुन प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक ०९.१२.२०२० रोजी रक्कम रु.६,००,०००/- चे कर्ज घेतले.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामिनदार आहेत. प्रतिवादी क्र.१ ने कर्ज रकमेवर द.सा.द.शे.१५ टक्के प्रमाणे वा संस्था वेळोवेळी ठरवील, त्याप्रमाणे व्याज व भरणा न केल्यास दंड द.सा.द.शे.२ टक्के प्रमाणे देण्याचे मान्य केले. प्रतिवादींनी वादीच्या हक्कात कर्ज कागदपत्रे करुन दिले.

३. खातेउता-याप्रमाणे दिनांक २५.१०.२०२५ अखेर रक्कम रु.१२,८२,७१८/- प्रतिवादी क्र.१ कडे बाकी आहेत. त्यामुळे, वादीने ती रक्कम व इतर खर्च मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ३ दाव्यात हजर झाले नाही. त्यामुळे, त्यांचेविरुद्ध निशाणी क्र.१ वर एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

५. प्रस्तुतचा दावा व दाखल केलेल्या दस्ताऐवजांच्या अनुषंगाने वादीचे विद्वान वकील यांचा तोंडी युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी किंवा त्यांच्या वतीने त्यांचे विद्वान

18/07/26

वकिल युक्तिवाद करण्याकरिता हजर नसल्यामुळे प्रतिवादींच्या युक्तीवादाशिवाय प्रकरण पुढे चालविण्यात आले.

६. वादीच्या वादपत्रावरुन विचाराधीन मुद्दे व त्या मुद्यांना मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे उत्तरे दिलीत ते खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी संस्था हे सिध्द करते काय की, प्रतिवादी हे व्यक्तीगत व सामुहिकरित्या रु.१२,८२,७१८/- द.सा.द.शे.१५ टक्के व वर्षिक २ टक्के दंड प्रमाणे परतफेड करण्यास जबाबदार आहेत ? | ...अंशत: होकारार्थी... |
| २. | आदेश व हुकुमनामा काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे... |

...का र ण मि मां सा...

विचाराधीन मुद्दा क्र.१ करिता –

७. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द कर्ज वसुलीसाठी दाखल केला असुन वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी रु.६,००,०००/- कर्जाची उचल केली. वादीने दाव्यातील कथनांच्या पुष्टयार्थ संस्थेचे अधिकारी श्री.निवृत्ती शंकरराव शेळके यांचे शपथपत्र दाखल केले. शपथपत्रातील मजकुर हा दाव्यातील मजकुराशी सुसंगत आहे.

८. वादीने ठराव (निशाणी क्र.१०), कर्ज मागणी अर्ज (निशाणी क्र.११), जमानतदारासंबंधी माहिती पत्रक (निशाणी क्र.१२), वचनचिठ्ठी (निशाणी क्र.१३), करारपत्र (निशाणी क्र.१४), कर्जरोखा (निशाणी क्र.१५), कलम-६३ अन्वये प्रमाणपत्र (निशाणी क्र.१६) व खातेउतारा (निशाणी क्र.१७) वर दाखल केले. दाव्यात दाखल कागदपत्रांवरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ ने कर्ज रु.६,००,०००/- वादीकडून घेतले व सदर कर्जास प्रनिवादी क्र.२ व ३ जामीनदार आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ३ दाव्यात हजर झाले नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द निशाणी क्र.१ वर

18/07/26

एकतर्फी आदेश पारित करण्यात आला. याउलट प्रतिवादींनी वादीचे कथन खोटे असल्याबाबत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर सादर केला नाही, इतकेच नव्हे तर प्रतिवादींनी स्वत:ची साक्ष देखिल नोंदविली नाही.

९. वादीने दाव्यातील रक्कम सिध्द करण्याकरीता खातेउतारा (निशाणी क्र.१७) दाखल केला. सदरच्या खातेउताऱ्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ कडे दिनांक २५.१०.२०२५ अखेर रक्कम रु.१२,८२,७१८/– बाकी असल्याचे दिसुन येते. वादीने दाव्यात द.सा.द.शे.१५ टक्के व्याजाची मागणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणातील खातेउतारा (निशाणी क्र.१७) चे गांभीर्याने अवलोकन केले असता सदरच्या खातेउताऱ्यामध्ये वादी संस्थेतर्फे प्रतिवादी क्र.१ कडून संस्थेच्या खातेउताऱ्यामध्ये नोटीस शुल्क व इतर शुल्क लादुन एकूण रू.९,४४०/– अशा एकंदरीत खर्चाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे वादी संस्थेने मागणी केल्याप्रमाणे रू.१२,८२,७१८/– वजा रू.९,४४०/– म्हणजे एकूण रू.१२,७३,२७८/– एवढी रक्कम वादी संस्थेची प्रतिवादी क्र.१ कडे थकीत असल्याचे स्पष्ट व सिध्द होते. त्यामुळे वादी संस्था केवळ रू.१२,७३,२७८/– मिळविण्यास हकदार आहे. वचनचिठ्ठी (निशाणी क्र.१३) व करारपत्र (निशाणी क्र.१४) मध्ये द.सा.द.शे.१५ टक्के व्याजाचा उल्लेख आहे. त्यामुळे, वादी द.सा.द.शे.१५ टक्के प्रमाणे व्याज आकारणीस हकदार आहे. तसेच, वादीने रु.१,०००/– किरकोळ व टायपींग खर्चाची मागणी केली आहे. परंतु, वादीने त्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे, वादी केवळ किरकोळ खर्च मिळविण्यास पात्र आहे, असे माझे मत आहे. वरील कारणास्तव वादीचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुद्ध अंशत: मंजुर करण्यात येतो, म्हणुन मी **विचाराधीन मुद्दा क्र.१ ला अंशत: होकारार्थी** असे उत्तर देतो.

**विचाराधीन मुद्दा क्र.२ करिता –**

१०. विचाराधीन मुद्दा क्र.१ ला दिलेल्या उत्तरांमुळे विचाराधीन मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे तो येणेप्रमाणे :–

१८/०७/२६.

:: आदेश ::

१) वादीचा दावा खर्चासह अंशत: मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी व्यक्तीगत व सामुहिकरित्या रक्कम रु.१२,७३,२७८/- व कर्जाची रक्कम रु.६,००,०००/- वर द.सा.द.शे.१५ टक्के प्रमाणे व्याज दावा दाखल केल्याच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १९.०१.२०२६ ते पुर्ण रक्कम वसुल होईपर्यंत वादीला द्यावे.

३) त्याप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषीत करण्यात आला.)

18/07/26

दिनांक – १८.०७.२०२६
ठिकाण – अकोला.

{व्हि.व्हि. जोशी}
न्यायाधिश
सहकार न्यायालय, अकोला.